वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विशेष योजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२६(भाग-२)/महामंडळे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ जून, २०१९

<u>वाचा</u> : शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, समक्रमांक, दि.११ जून, २०१९.

शासन निर्णय

वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीला कामकाजासाठी आवश्यक त्या सुविधा संदर्भिय दि.११ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयातील अ.क्र.१ व २ येथे नमूद बाबी रद्द करण्यात येत असून त्या ऐवजी खालील बाबींचा अ.क्र.१ व २ म्हणून समावेश करण्यात येत आहे.

(१) वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षांना समितीचे कार्यालयीन कामकाज सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळाच्या कार्यालयीन जागेत दि.२२ ऑगस्ट, २०१९ पर्यंत एक दालन आवश्यक त्या कार्यालयीन सुविधांसह उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ यांनी तात्काळ करावी.

(२) समितीच्या कामकाजामध्ये सहाय्य करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ यांचे कार्यालयातील १ लिपिक व १ शिपाई यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. सदर कर्मचाऱ्यांच्या सेवा समितीसाठी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात आवश्यक ते आदेश व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ यांनी तात्काळ निर्गमित करावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१७१६३४५५५३२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.06.17 16:39:18 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण), मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण), मंत्रालय, मुंबई.
४) श्री.विजय लक्ष्मण चौगुले, एल १०५, यश पॅराडाईज, से.८, ऐरोली, नवी मुंबई.

५) स्वीय सहायक, प्रधान सचिव (विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
६) संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे/नाशिक/औरंगाबाद.
८) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या., मुंबई.
९) सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे.
१०) निवड नस्ती.